**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक ०९ सप्टेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत काल रात्री मुंबईत झालेल्या बैठकीत भाजपकडून १६० जागा लढविण्याबाबत चर्चा.
2. आरक्षित जागांच्या व्यतिरिक्त सर्वसाधारण जागांवर देखील आदिवासी प्रतिनिधी निवडणूक लढवणार असल्याची ॲड.प्रकाश आंबेडकर यांची माहिती.
3. मराठा आरक्षण पुनर्विचार याचिकेवर ११ सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी.
4. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज अतिवृष्टीचा रेड अलर्ट तर, गोंदियात ऑरेंज अलर्ट जारी; नागपूर, भंडारा, वर्धा आणि यवतमाळ इथंही मुसळधार पावसाची शक्यता.

****

**अमित शहा**

आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपनं १६० जागा लढवाव्या. त्यातल्या किमान १२५ जागा जिंकण्याचं उद्दिष्ट ठेवावं यावर भाजपच्या कालच्या बैठकीत चर्चा झाल्याचं, वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल रात्री मुंबईत भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याशी जागा वाटपाची, अनौपचारिक चर्चा सुरू झाली असून, त्यांना ७०हून अधिक जागा देण्यासंबधी, निर्णय काळजीपूर्वक घ्यावा अशी अपेक्षा, राज्यातल्या नेत्यांनी व्यक्त केली. शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉँग्रेसची ताकद आणि जिंकून येण्याची क्षमता पाहूनच त्यांना जागा द्याव्यात अशी चर्चा यावेळी झाल्याचं, या बातमीत म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकी दरम्यान झालेल्या चुका लक्षात घेऊन ही निवडणूक महायुतीमधल्या पक्षांनी एकत्रितरित्या लढवावी. त्यात भाजपाची ‘मोठ्या भावाची’ भूमिका असावी याचा पुनरुच्चार भाजपाच्या नेत्यांनी, अमित शहा यांच्यासमोर केला. एकमेकांवर सार्वजनिकरित्या टीका टाळण्याचा सल्ला, अमित शहा यांनी राज्यातल्या नेत्यांना दिल्याचंही या बातमीत म्हटलं आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबई दौ-यावर असून, आज त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी तसंच,

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवास स्थानी दर्शन घेतलं. मुंबईच्या प्रसिद्ध लालबागच्या राजासह इतर गणेश मंडळांना शहा यांनी भेट दिली. त्याचप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे अध्यक्ष, माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार यांनी आज लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं.

****

प्रकाश आंबेडकर

आरक्षित जागाच आदिवासींनी लढवाव्यात असा एक समज निर्माण झाला आहे तो या विधानसभेच्या निमित्तानं तोडायचा मानस आम्ही केला असून, काही सर्वसाधारण जागेवर आदिवासी प्रतिनिधी निवडणूक लढवतील असं प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष, ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी मुंबई इथल्या पत्रकार परिषदेत केलं. राज्यातील सर्व आदिवासी संघटनांना सोबत घेऊन निवडणूक लढणार असल्याचं यावेळी त्यांनी जाहीर केलं. ॲड.आंबेडकर म्हणाले की, विधानसभेच्या 24 मतदार संघामध्ये, 22 टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. पण 15 टक्क्यांपासून तीस टक्क्यांपर्यंत लोकसंख्या असलेले, वीस मतदारसंघ आहेत. महाराष्ट्रातला आदिवासी आता एकत्र आला असून, यापुढील काळात त्यांची एकत्रित वाटचाल होणार आहे. या दृष्टीनं महाराष्ट्रात तीन ठिकाणी जाहीर कार्यक्रम होणार आहे. जळगाव, मनमाड आणि नागपूर या ठिकाणी हे कार्यक्रम होतील. नागपुरात पाच ऑक्टोबर रोजी हा कार्यक्रम होत असल्याची माहिती, आंबेडकर यांनी दिली.

****

वक्फ बोर्ड -पत्रपरिषद

लोकसभेत सादर केलेल्या नवीन प्रस्तावित, वक्फ दुरुस्ती विधेयकात, असंवैधानिक तत्वांचा अंतर्भाव करून, हे विधेयक वक्फ बोर्डाच्या जमिनी, बोर्डाचे कार्यक्षेत्र यामध्ये हस्तक्षेप करणार आहे असा आरोप, राज्य वक्फ बोर्डाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी, अब्दुल रऊफ शेख यांनी केला आहे. जमाते इस्लामी हिंदच्यावतीनं, नागपूरात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. वक्फ विधेयकामध्ये केंद्रीय वक्फ परिषद गठन करताना, गैर-मुस्लिम सदस्यांचा समावेश, वक्फच्या जमिनी या महसूल जमिनी म्हणून घोषित करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांना असणारा अधिकार, तसंच वक्फ देणाऱ्या व्यक्तीसाठी, इस्लामचे पाच वर्षाचे पालन अशा तरतुदी, या जाचक असल्याचं रऊफ शेख यांनी यावेळी सांगितलं. या पत्रकार परिषदेला ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे कार्यकारी सदस्य, अब्दुल पारेख ही उपस्थित होते.

****

## सुनावणी

मराठा आरक्षणाच्या पुनर्विचार याचिकेवर, अकरा सप्टेंबरला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या सुनावणीत अंतिम निर्णय येण्याची शक्यता असल्याचं, पुनर्विचार याचिकाकर्ते, मराठा समन्वयक विनोद पाटील यांनी याबाबत माहिती दिली आहे. मराठा समाजाला, २०१९मध्ये, एस.ई.बी.सी. हे शिक्षण आणि नोकरीसाठी आरक्षण देण्यात आले होते. हे आरक्षण उच्च न्यायालयात वैध ठरले होते. सर्वोच्च न्यायालयानं मात्र मराठा आरक्षण रद्द केलं होतं. या निर्णयाचा पुनर्विचार करावा यासाठी, विनोद पाटील यांनी, सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

****

## सुधीर मुनगंटीवार/सिंधी साहित्य अकादमी

'आपण सनातन संस्कृतीत, ऋग्वेदाचा उल्लेख करतो. या महान ग्रंथात सिंधू आणि सिंध या शब्दांचा उल्लेख असून, ही एक महान संस्कृती आहे. सिंधी समाजाने निर्माण केलेल्या साहित्याचं, देशाच्या प्रगतीत मोठ योगदान आहे. या साहित्यातील संदेश, त्यातील भाव आणि आशय समाजाच्या विविध घटकापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी साहित्य अकादमीची आहे असं, प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आणि चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलं. महाराष्ट्र राज्य सिंधी साहित्य अकादमीचा, 2023-24 चा पुरस्कार सोहळा नुकताच चंद्रपूर इथं आयोजित करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

****

## मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २९ सप्टेंबरला, आकाशवाणीवरुन मन की बात कार्यक्रमाद्वारे, देश-विदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहे. या कार्यक्रमाचा हा, ११४वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी आपल्या कल्पना आणि सूचना, १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर, २७ सप्टेंबरपर्यंत देता येतील. तसंच माय जीओव्ही संकेतस्थळावरून देखील, सूचना पाठवता येतील.हा कार्यक्रम २९ सप्टेंबरला सकाळी अकरा वाजता, आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन प्रसारित करण्यात येईल.

****

## गणेशोत्सव विशेष

नागपुरातील चर्चेतला गणपती म्हणून पांचपावली परिसरातील, चंद्रशेखर पुरीच्या गणपतीची ओळख असून, मागील अनेक वर्षांपासून, पुरी परिवार, गणेशोत्सवात

सामाजिक प्रश्नांवर प्रखर टिका-टिपणी करणारे देखावे लावतात. यावेळी देखील महिला अत्याचारावर भाष्य करणारा देखावा करण्यात आला असून, वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी करणारा देखावा सुद्धा पाहायला मिळणार आहे. नागपूरच्या लक्ष्मीनगर इथल्या पितळे शास्त्री हायस्कूल आणि विदर्भ आदिवासी विद्यार्थी वसतीगृहाच्या विद्यार्थ्यांनी, नैसर्गिक रंग आणि रद्दीचा वापर करून, "इको फ्रेंडली बाल गणेश" मुर्तीची स्थापना केली आहे. उत्सव काळात वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, आरोग्य तपासणी तसंच विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. विदर्भातील अष्टविनायकांपैकी दोन भंडारा जिल्हयात विराजित असून, भृशुंड गणेश हा, भंडारा शहरातील मेंढा भागात आहे. तर सर्वतोभद्र पंचमुखी गणेश हा पवनी तालुक्यात स्थापित असून, दोन्ही मूर्त्यांना जवळपास सातशे वर्षाचा इतिहास आहे. गणेशोत्सवा दरम्यान या ठिकाणी भक्तांची विशेष गर्दी बघायला मिळत आहे.

****

## जटायू ग्राम मित्र

विलुप्त होण्याच्या मार्गावर असलेल्या, भारतीय गिधाड या पक्षी प्रजातीसाठी, नागपूरच्या पेंच अभयारण्यात जटायू ग्राम मित्र, हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. यात गावातले पशुपालक आणि इतर लोक जंगलातल्या एका विशिष्ट ठिकाणी नैसर्गिकरीत्या मरण पावलेल्या पशुपक्षांचे मृतदेह टाकतील, ज्यामुळ गिधाडांना अन्न मिळणं निश्चित होईल. पशुपक्षांचे मृतदेह ठरलेल्या ठिकाणी नेऊन टाकण्या-या लोकांना, वाहतुकीचा खर्च दिला जाणार असून, हा प्रकल्प सध्या एक वर्षासाठी राबवण्यात येणार आहे.

****

## डी.सोमकुंवर निधन

मुंबईच्या दूरदर्शन केंद्रात तीस वर्षांपेक्षा अधिक काळ, रंगभूषाकार म्हणून सेवा दिलेले, डी.सोमकुंवर यांचं परवा नागपूर इथं राहत्या घरी वयाच्या, ७९व्या वर्षी निधन झालं. सत्तरच्या दशकात, एफ.टी.आय.आय. पुणे इथून प्रशिक्षण घेऊन त्यांनी मुंबई दूरदर्शन आणि कलाक्षेत्रात आपला रंगभूषाकार म्हणून ठसा उमटवला होता. त्यांनी रंगभूषेचं प्रशिक्षण देण्यासाठी देशपातळीवर अनेक कार्यशाळा घेतल्या. 'रंगभूषा गाईड', 'कोकणातील रमाबाई', 'मौर्य राजवंश', 'सिद्धार्थ जन्मला लुंबिनी' ही त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्यांनी १९८७-८८च्या काळात 'शरण बुद्धा' या स्वलिखित नाटकाची निर्मितीही केली होती.

****

## मुख्यमंत्री माझी शाळा

'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात राज्यामध्ये बुलढाणा पहिल्या क्रमांकावर तर अकोला जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. अकोला जिल्ह्यातील 94% शाळांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला आहे. केंद्र पातळीवरील मुल्यांकनातही अकोला जिल्ह्यानं अव्वल स्थान पटकावलं आहे. अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगर परिषद, महानगरपालिका आणि खाजगी शाळांची संख्या, 1,856 एवढी असून त्यापैकी १,८०१ शाळांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत, मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा उपक्रमात सहभाग नोंदविला आहे.

****

## हवामान-पूर

विदर्भातील चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी करण्यात आला असून, गोंदिया जिल्हा देखील, जोरदार पर्जन्यवृष्टीचा अंदाज असल्यानं ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय नागपूर, भंडारा, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. याशिवाय पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये, मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. उद्या नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात देखील जोरदार पावसाची शक्यता, हवामान विभागानं वर्तवली आहे. नागपुरात आज सायंकाळी साडेचारच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाला असून, नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं पुढील तीन तासांमध्ये, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोलीत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. दरम्यान, गडचिरोली जिल्ह्याच्या, दक्षिण भागात काल रात्री मुसळधार पाऊस पडल्यानं, पर्लकोटा नदीला पूर आला असून, पुराचं पाणी, भामरागड गावात शिरलं आहे. इथल्या काही कुटुंबांना, निवारा गृहात हलविण्यात आलं असून, मागील चोवीस तासांत भामरागड तालुक्यात सर्वाधिक, १६४.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अतिवृष्टीमुळ पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागल्यानं, भामरागड-आलापल्ली मार्गावरील वाहतूक बंद आहे. मुलचेरा तालुक्यातील दिना नदीला पूर आल्यानं, मुलचेरा-आष्टी मार्गही बंद असल्याची माहिती, प्रशासनानं दिली.

*****